पंडित दीनदयाल उपाध्याय
स्वयम् योजनेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:-१५ ऑक्टोबर, २०१६.

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखाली अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९५ वसतीगृहे मंजुर असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता ६१०७० इतकी आहे. त्यापैकी ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून त्यापैकी २८३ वसतीगृहे ही मुलांची व २०८ वसतीगृहे ही मुलींची आहेत, या वसतीगृहांची क्षमता ५८४९५ इतकी आहे. राज्यात विविध ठिकाणी महाविद्यालये, उच्च महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, आय.टी.आय, अल्प मुदतीचे कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम इत्यादिंची सोय झाली आहे. सदर उच्च शैक्षणिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर विद्यार्थी ग्रामीण तसेच दुर्गम क्षेत्रातून तालुक्याच्या/ जिल्ह्याच्या/ विभागीय मुख्यालय/ महानगरांच्या ठिकाणी शिक्षणासाठी येतात. मात्र त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना या ठिकाणी निवास, भोजन तसेच इतर शैक्षणिक खर्च परवडत नसल्याने त्यांना अशा सुविधा मोफत पुरविण्यासाठी विभागांतर्गत शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश देण्यात येतो.

मात्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने शासकीय वसतिगृहांतील उपलब्ध प्रवेश क्षमता कमी पडत आहे. मागील ३ शैक्षणिक वर्षामध्ये वसतीगृह प्रवेशासाठी सरासरी ७५००० अर्ज प्राप्त होत आहेत. याप्रकरणी विभागाच्या कार्यान्वित वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ असल्याने वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृह प्रवेशासाठी विविध लोकप्रतिनीधी, विविध विद्यार्थी संघटना तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून नवीन वसतीगृहे मंजूर करण्याबाबत तसेच वसतीगृहांची प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत सतत मागणी होत आहे. तथापि, नवीन वसतीगृहे मंजूर करणे, वसतीगृह प्रवेशाच्या क्षमतेत वाढ करणे, त्याकरिता भाड्याच्या इमारती शोधणे तसेच नवीन कर्मचारी नियुक्ती करणे इत्यादी बाबींकरिता होणारा विलंब तसेच राज्य शासनावरील अनावर्ती भांडवली खर्च टाळण्यासाठी सद्यस्थितीत कार्यरत वसतीगृहांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करूनही प्रवेश न मिळणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी थेट रक्कम वितरण करण्याबाबत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जमातीच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना"** राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण २०,००० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**३.** तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश घेणे किंवा **पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्** योजनेचा लाभ घेणे हे दोन पर्याय विद्यार्थ्याकडे उपलब्ध राहणार आहेत. सबब आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय वसतीगृहातील एकूण मंजूर प्रवेश क्षमता ६१,०७० व **पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्** योजनेंतर्गतची क्षमता २०,०००, अशा एकूण ८१,०७० एवढ्या क्षमतेच्या कमाल ५० टक्के मर्यादेत सन २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांना पसंतीनुसार व गुणानुक्रमाने **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्"** योजनेचा लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**४.** सदर योजनेंतर्गत खालील ३ प्रकारे वर्गीकरण केलेल्या शहरांमधील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या तथापि, शासकीय वसतीगृहात प्रवेशीत नसलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इ. १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे निश्चित केलेनुसार विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यात यावी.

| **अ.क्र** | **खर्चाची बाब** | **मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर महसुली विभागीय मुख्यालय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर जिल्हयाचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० |
| | **प्रती विद्यार्थी एकूण संभाव्य वार्षीक खर्च** | **६०,०००** | **५१,०००** | **४३,०००** |

**टीप** - वरील रक्कमे व्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.५,०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रु.२,०००/ इतकी रक्कम **शैक्षणिक साहित्यासाठी** ठोक स्वरुपात देण्यात येंईल.

**५. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील.**

**अ) <u>मुलभूत पात्रता</u>**

(१) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्यांने अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(२) विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

(३) विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्ग्न करणे बंधनकारक राहील.

(४) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थ्याचे पालक रहिवाशी नसावेत.

(५) सदर योजनेचा लाभ मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांने संबंधित शहरामध्ये राहणे आवश्यक राहील.

**ब) <u>शैक्षणिक निकष</u>**

(१) सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

(२) केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(३) एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. यामध्ये प्रथम पदवी पूर्ण न करता दुसऱ्या पदवीसाठी प्रवेश मिळाल्यास सुध्दा लाभ घेता येणारा नाही.

(४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

(५) विद्यार्थ्याची संस्थेमधील / महाविद्यालयातील उपस्थिती ८० टक्केपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील.

(६) विद्यार्थ्यांची निवड करताना गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

(७) निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**क) <u>इतर निकष</u>**

(१) योजनेचा लाभ १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास देण्यात येईल. तथापि एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ७ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल. सदर योजनेचा ७ वर्षे लाभ घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्यास वसतीगृहात प्रवेश मिळणार नाही.

(२) सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही.

(३) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय २८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

(४) योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने आदिवासी विकास विभागाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

(५) विद्यार्थ्यास आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा.

(६) विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

(७) आदिम जमातीच्या व अनुसुचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राथम्याने देय राहील.

**६. सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अनुदान वितरण करण्यात यावे :-**

(१) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय रक्कमेपैकी भोजन व निवासभत्त्याची रक्कम प्रत्येक तिमाहीस आगावू देण्यात येईल. मात्र सदर योजनेची संगणक प्रणाली विकसित झाल्यानंतर आणि योजना सुरळीतपणे सुरू झाल्यांनंतर भोजन व निवास भत्त्याची रक्कम प्रत्येक महिन्याला आगावू देण्यात येईल.

(२) तथापि, शैक्षणिक साहित्याकरिता विहित केलेली रक्कम शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला एकदाच देण्यात येईल.

(३) सदर योजनेंतर्गत निवड होणाऱ्या विद्यार्थ्यास आहार व निवास सुविधा मोफत उपलब्ध करण्यात येत असल्याने भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती मार्गदर्शक सूचनांनुसार अशा विद्यार्थ्यास १/३ या दराने निर्वाहभत्ता अनुज्ञेय राहील. त्यानुसार अशा पात्र विद्यार्थ्यास केंद्र शासनाचा अनुज्ञेय १/३ निर्वाह भत्ता अदा केल्यानंतर **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्"** योजनेतंर्गत शहरप्रकारानुसार निश्चित करण्यात आलेला संपूर्ण निर्वाहभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. अशा विद्यार्थ्यास केंद्र शासन पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती अंतर्गत १/३ निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरित फरकाची निर्वाह भत्ता रक्कम अनुज्ञेय राहील.

(४) विद्यार्थ्याची संस्थेमधील / महाविद्यालयातील उपस्थिती ८० टक्केपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील. त्याबाबत प्रत्येक तिमाहिस संबंधित शिक्षण संस्थेकडून उपस्थिती पत्रक ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्राच्या आधारेच पुढील अनुज्ञेय रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

(५) या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न केलेल्या राष्ट्रीयकृत बँक खात्यात संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत अनुज्ञेय रक्कम थेट वितरीत करण्यात येईल.

**७.** (१) सदर योजनेमध्ये विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने शिक्षण न घेता नोकरी /व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर देखील असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व अशा लाभ धारकास योजनेंतर्गत अदा करण्यात आलेली रक्कम व्याजासह वसुली करण्यात येईल.

(२) या योजनेचा लाभ घेत असलेला विद्यार्थी अनधिकृतपणे विभागाच्या किंवा अन्य विभागाच्या वसतीगृहामध्ये राहत असल्याचे आढळल्यास त्याला सदर योजनेच्या लाभाकरिता / वसतीगृह प्रवेशाकरिता अपात्र ठरवून त्याचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच फसवणुकीबाबत त्याचे संबंधित शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करण्याबाबतही शिफारस करण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६६/व्यय-१४, दि.१२/०९/२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६१०१८१२३०५६४२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2016.10.18 12:32:32 +05'30'

( सु.ना.शिंदे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री , आदिवासी विकास विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री , आदिवासी विकास विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१६.आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१७.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
१९.सर्व उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. निवड नस्ती (का-१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.